**माधवी कुंटे**

लेखक, मुक्त पत्रकार

निवास : नारायण निवास, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७. भ्रमणध्वनी : ९८१९६७९५५०

॥ श्री ॥

नारायण निवास ही साठएक वर्षांपूर्वीची जुनी वास्तू ! हरी नारायण कुंटे यांनी ती उभारली. साध्या, प्रकाशमान हवेशीर अशा या वास्तूच्या कुणीही प्रेमात पडावे इतकी ती सुंदर होती. त्यात मालक असलेल्या कुंटे परिवाराखेरीज अनेक भाडेकरूही निवास करून होते. कालमानाने वास्तूची पडझड झाली. नवीन पिढीला देखरेख जमेना. वास्तूचा पुनर्विकास करण्यासाठी ती बांधणी क्षेत्रातील उद्योजकाऱ्या हाती सोपवावी असं ठरलं खरं पण आपलं घर कुणाच्याही हाती सोपवतांना मनात शंका असतात. कातरता असते.

सर्वानुमते आम्ही आमची इमारत पुनर्विकासासाठी निवारा डेव्हलपर्सचे श्री. प्रसाद पाटील यांच्या हाती विश्वासाने सोपविली. त्यांनी आमचा विश्वास सार्थ ठरविला. जुन्या इमारतीची कागदपत्रे, वारसांची गुंतागुंत, अनेक परवानग्या, इमारतीच्या बांधकामाआड येणाऱ्या असामाजिक तत्वांनी उभे केलेले अडथळे, कांही कारणास्तव कराव्या लागणाऱ्या कोर्टकचेऱ्या सर्वांना समर्थपणे तोंड दिले. विकासकाळात रहिवासींची उत्तम पर्यायी निवासव्यवस्था केली. अनेक अडचणी, संकटांवर मात करीत बावनकशी सोन्यासारखे काम केलं. डौलदार, सोयींनी सुसज्ज, प्रकाशमान, आधुनिक, मजबूत आणि देखणी अशी नारायण निवास ही इमारत हनुमान रोडवर दिमाखात उभी झाली. एकंदर व्यवहार अत्यंत प्रामाणिकपणे झाले ही फार मोठी जमेची बाजू ! हस्तांतरणापासून गृहसंस्था स्थापने पर्यंतच्या सर्व आवश्यक गोष्टी निवारा डेव्हलपर्स तर्फे सुरळीतपणे जबाबदारीने घडवून आणल्या गेल्या. या काळात विकसक श्री. पाटील यांच्याशी व्यवहारापलिकडे स्नेहाचे अनुबंध जुळून आले ही एक विशेष वेगळी गोष्ट !

सहाजिकच आज २०२१-च्या उंबरठ्यावर श्री. प्रसाद पाटील आणि निवारा डेव्हलपर्सना धन्यवाद द्यावेसे वाटतात आणि त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभचिंतनही करते.

माधवी कुंटे